# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१**

EMAIL : **estmumbaicity@gmail.com** TEL- ०२२-२२६६५२३३


क्र. आस्था/टे-१/आपत्ती व्यवस्थापन/ करोना वायरस /२०२० दिनांक - 16 MAR 2020

## जाहीर आवाहन

मुंबई शहरात करोना वायरसचा प्रादुर्भाव व संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे, महाराष्ट्र शासनाने करोना वायरसचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून सार्वजनिक ठिकाणी गर्दी करु नये अथवा गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे असे आवाहन केले आहे व साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ मधील तरतूदी अंमलात आणल्या आहेत.

उपरोक्त शासनाच्या सूचना विचारात घेता, मी जिल्हाधिकारी मुंबई शहर, मुंबई शहरातील सर्व धर्मांच्या सार्वजनिक प्रार्थना स्थळांच्या ठिकाणी होणारे सर्व सार्वजनिक /धार्मिक कार्यक्रम / यात्रा /उत्सव अथवा गर्दी होणारे सर्व सांस्कृतिक कार्यक्रम दि.३१ मार्च २०२० पर्यंत रद्द करणेत यावे असे आवाहन करीत आहे.

भारतातील प्रसिध्द अश्या सिध्दीविनायक मंदिर न्यासाने भाविकांच्या प्रती असणारे सामाजिक दायित्व लक्षात घेता पुढील सूचना मिळेपर्यंत ज्याप्रमाणे दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याच धर्तीवर इतर सर्व सार्वजनिक व धार्मिक आस्थापना यांनी अश्या स्वरुपाचा निर्णय तातडीने लागू करावा असे आवाहन मी करत आहे.

(राजीव निवतकर)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर.